**प्रेस नोट            दिनांक ३०/११/२०२४**

## पश्चिम प्रादेशिक विभागाअंतर्गत रॅश ड्राईव्हीग करणाऱ्या वाहन चालकांविरोधात कारवाई केलेबाबत.

दिनांक २९/११/२०२४ रोजी रात्रौ दरम्यान पश्चिम प्रादेशिक विभाग, मुंबई अंतर्गत पोलीस ठाणे हद्दीत विविध ठिकाणी नाकाबंदीचे आयोजन करून रॅश ड्राईव्हींग करणा-या वाहन चालकांविरोधात विशेष मोहिम राबविण्यात आलेली होती.

सदर विशेष मोहिमे दरम्यान रॅश ड्राईव्हींग करणा-या वाहन चालकांविरूध्द **भारतीय न्याय संहित अन्वये एकूण ४० गुन्हे दाखल करून, एकूण १६२ दुचाकी वाहने** जप्त करण्यात आलेली आहेत. तसेच मोटार वाहन कायदयान्वये **एकूण ६८९ वाहन** चालकांविरूध्द कारवाई करण्यात आलेली आहे. यापुढेही रॅश ड्राईव्हींग करणा-या आणि वाहतूक नियमांचे उल्लंघन करणा-या वाहन चालकांविरोधात कठोर कारवाई करण्यात येणार आहे.

-----------

**जप्त करण्यात आलेल्या दुचाकी वाहनांचे फोटो.**



